Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- X ISSUE- III MARCH 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# काळाराम मंदिर सत्याग्रहातील स्त्रीयांचा सहभाग

**सहाय्यक प्रा. नरेंद्र नरसिंग सुर्यवंशी**
इतिहास विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय,
कळे, ता. पन्हाळा. जि. कोल्हापूर

**प्रस्तावना :**

भारताला धर्मराष्ट्र बनविण्याचे प्रयत्न मोठया आमरित्या सुरु आहेत. गल्लीतल्या मंदिरापासून दिल्लीतल्या परिषदा पर्यंत त्याचा अनुभव येत आहे. धार्मिक स्थळे राजकारणाचे अड्डे बनत आहेत. धर्माच्या चौकटीत सामाजिक न्याय मिळणे किती अवघड असते याचा पुरावा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह ते आत्ताचा शनिशिंगणापूर शनि चौथरा यावरील पूजेचा अधिकारचे आंदोलन हा आहे. ब्रिटीश शासनाने त्यावेळी घेतलेली भूमिका व सध्याच्या राज्यकत्र्यांची भुमिका तपासल्यास स्वातंत्र्याचे झाले काय ? आमच्या हाती आले काय ?1 ही घोषणा मन विषण्ण करणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाने सनातनी व्यवस्थेला प्रचंड हादरे दिले. त्याचे परिणाम गोलमेज परिषदेवरही झाले. महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर बनाव बेबनावाची ठिणगी याच काळात पडली. 2 मार्च 1930 ला सुरु झालेला हा सत्याग्रह अनेक वळणे घेत सन 1936 मध्ये थांबला. सतत सहा वर्षे काळाराम मंदिर प्रवेशाचा संघर्ष सुरु राहिला. या संघर्षात पुरुषांप्रमाणेच अनेक स्त्रीयांनीही मोलाचा सहभाग नोंदविला. लाठ्याकाठ्या, दगडफेक यांना तोंड दिले. अनेकांनी कारावासही भोगला. दलित चळवळीतील पुरुषांना आणि स्त्रीयांनीही तुरुंगवास सोसण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. या चळवळीत स्त्रियांनी भाग घेतला आणि तुरुंगातही गेल्या हे दलित मुक्ती आंदोलनात प्रथमच घडले.

2 मार्च1930 रोजी सुरु झालेल्या या नाशिक सत्याग्रहात डॉ. आंबेडकरांसोबत भाऊराव गायकवाड व इतर नेते तसेच मंदिराच्या दरवाजापाशी धरणे धरुन बसलेल्या सत्याग्रहामध्ये 37 स्त्रिया होत्या. 2 नाशिक सत्याग्रहानंतर सुरु झालेल्या मिठाच्या कायदेभंगाच्या चळवळीत स्त्रियांनी देशभर फार मोठया प्रमाणात भाग घेतला याचे श्रेय महात्मा गांधीनी दिले जाते ते योग्यच आहे. परंतु त्यांच्या आधी सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मुळशी सत्याग्रहात मावळ्यांच्या स्त्रियांनी आणि बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली झालेल्या नाशिक सत्यागृहात अस्पृश्य स्त्रियांनी भाग घेतला होता याचीही आठवण ठेवणे आवश्यक आहे.

1 एप्रिल 1930 सत्याग्रहांची धरपकड सुरु झाली. बापू साहेब राजभोज यांच्यासह 12 सत्याग्रहांना 3 एप्रिल रोजी अटक झाली त्यापौकी दोन स्त्रिया होत्या. 7 एप्रिल 1930 रोजी अस्पृश्य मुलींस मागे लोटताच तिने फाडकन पुजा·याच्या तोंडात भडकावली. तोंडात खाऊन पुजारी कसे स्पृश्य राहिले ? 3 असे तत्कालीन वृत्तपत्र कोहिनूर मध्ये उल्लेख सापडतो. 9 एप्रिल 1930 च्या दंगलीत डॉ. आंबेडकर आणि भास्करराव कद्रेकर जखमी झाल्याचे वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने 10 एप्रिल 1930 च्या अंकात प्रसिध्द केले होते. टाईम्सच्या वृत्तानुसार अनेक महार स्त्रियांना सनातन्यांनी बेदम मारहाण केली. त्यापौकी एका स्त्रीला जिल्हाधिकारी गॉर्डननी वाचवले आणि मोटारीत घालून दवाखान्यात पोहचवले असे वार्ताहराचे म्हणणे होते. 28 एप्रिल 1930 च्या सत्याग्रहामध्येही स्त्रीयांचा सहभाग दिसून येतो.

15 एप्रिल 1932 च्या मंदिर प्रवेश सत्याग्रह आंदोलनात 14 अस्पृश्य स्त्रियांना पोलिसांनी अटक केली. यापौकी पावली संभू काळे या 75 वर्षे वय असलेल्या महिलेस पंधरा दिवसांची साधी कैद आणि उरलेल्या स्त्रियांना एक महिना सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. 4 अशा अनेक प्रसंगाचे वर्णन करता येते त्यामध्ये स्त्रियांनी जीव धोक्यात घालून चळवळीत सहभाग घेतला. अनेक स्त्रियांपौकी काही स्त्रियांचा उल्लेख येथे करता येतो.

**उद्दिष्टे:**

१. स्वतंत्रता आंदोलना मध्ये स्त्रियांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

२. दलित चळवळी मध्ये स्त्रियांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

**गृहीतके:**

१. स्वतंत्रता आंदोलना मध्ये स्त्रियांच्या सहभाग होता.

२. दलित चळवळी मध्ये स्त्रियांचा सहभाग होता.

३. काळाराम मंदिर सत्याग्र हात स्त्रीयांचा सहभाग होता.

**साधने:**

काळाराम मंदिर सत्याग्रहातील स्त्रीयांचा सहभाग ह्या शोधनिबंधां साठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आलेला आहे.

1) **श्रीमती रमांबाई सिताराम राजे** :- रा. नाशिकक, जन्म वर्ष 1902 - अशिक्षित

काळाराम मंदिर सत्याग्रहात प्रत्यक्ष सहभागी रखमाबाई म्हणतात, "आमच्या समाजावर अस्पृश्य म्हणून स्पृश्य लोकांकडून फार जुलुम होत असत. स्पृश्य वस्तीतून वहाणा (चपला) घालून जाण्याची आम्हांला मनाई होती. जनावरांपेक्षारही हीन वागणुक दिली जात होती. याच काळात डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी काळाराम मंदिर प्रवेशाची चळवळ सुरु केली. त्यात मी व माझे पती दोघांनीही भाग घेतला. त्यावेळी माझे वय 28 वर्षे होते. 2 मार्च 1930 च्या सत्याग्रहात शिस्तबध्द सत्याग्रही ओळीने उभे होते. डॉ.बाबासाहेबांचे मार्गदर्शन झाले. राम मंदिराच्या दरवाज्यावर कसून श्रीराम जयराम म्हणत धरणे धरुन बसलो. आम्हास खूप त्रास सोसावा लागला. काही सनातनी ब्राम्हण शिंची, इथं का बसलास, जा तुझ्याघरी, तुझ्या नव·याकडे असे म्हणून शिवी देत चिडवीत. आम्ही धरणे धरु नये म्हणून अंगावर घाण फेकित. जेवणाच्या पत्रावळीवर धुळ फेकीत. रथ ओढण्याच्या दिवशी दगडफेक केली गेली त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरही जखमी झाले. दंगलीत अनेकांची डोकी फुटली पण सत्याग्रह थांबला नाही. हे असे सतत पाच वर्षे चालू होते. बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाने आमचा जोम वाढला होता. सत्याग्रहात प्राण गेला तरी हरकत नाही पण माणुसकीचे हक्क मिळवून डॉ. बाबासाहेबांची चळवळ जगात यशस्वी ठरावी असा आमचा निर्धार होता. त्यानुसार सतत पाच वर्षे आम्ही सत्याग्रहातच राहिलो."5

2) **यमुनाबाई गोविंद जाधव - ओझर, नाशिक, जन्म - 1919, शिक्षण 5 वी.**

सत्याग्रहाच्या दिवसात 144 कलम तोडले, मिरवणूक काढली म्हणून अटक झाली. वयाच्या 11 व्या वर्षी अटक म्हणून मैजिस्ट्रेट ने अल्पवयीन म्हणून माफी मागण्यास सांगितले पण मी माफी मागणार नाही म्हटले. मग आम्हांला धुळ्याच्या तुरुंगात पाठवले ते वर्ष होतं 1930. दोन महिने कैद झाली. प्रत्यक्ष सत्याग्रहात मिरवणूकीवर दगडफेक झाली पण सत्याग्रह सोडून जावे असे वाटले नाही. बाबासाहेब आंबेडकर सत्याग्रहींना भेटण्यास जेलमध्ये आले. स्त्रियांनी घोषणा दिल्या. जेलरने मज्जाव केला पण आम्ही घोषणा देत राहिलो. बाबासाहेबांनी मला जवळ घेऊन विचारपूस केली. डोक्यावरुन हात फिरवला हा आयुष्यातील सर्वात मोठा आनंदाचा प्रसंग होता. सत्याग्रह देवदर्शनासाठी नाही तर माणुसकीच्या हक्काकरीता होता. 6

3) **मंजूळाबाई नामदेव वाघ - जळगाव, ता. देवळा, जन्म 1917, शिक्षण 4 थी**

मनमाड येथील बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाने प्रभावित होऊन मी नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रहात सहभागी झाले. त्यावेळी वय केवळ 13-14 वर्षाचे होते. सत्याग्रहात जबरदस्त मारामारी, दगडफेक, लाठ्याकाठ्या,सोसावा लागला. उपाशी रहावे लागले. शिवीगाळ व विटंबना सवर्ण हिंदू करीत होते. सत्याग्रहाच्या मिरवणूक हजारो लोक होते. बाबासाहेब होते. आमच्या घरचे सर्व मंडळी होती. पोलीसांनी लाठीमार केला. स्पृश्यांनी दगडफेक व दंगल केली. हा सत्याग्रह म्हणजे हक्काचे भांडण होते. 7

4) **श्रीमती ग्राऊबाई वामन उनवणे - नाशिक रोड, जन्म** : 1917

काळाराम मंदिर सत्याग्रहाचे वेळी माझे वय 13 वर्षे होते.सत्याग्रहाच्यावेळी मला भिती वाटली नाही. बाबासाहेबांच्या चळवळीत जेलमध्ये 13 दिवस होते. सत्याग्रहात रात्रीच्यावेळी झोपण्यासाठी अंथरुण, पांघरुण नसे. त्यावेळी पोलिसांनीही खुप त्रास दिला. त्यावेळी सत्याग्रहींवर दगड फेक झाली. माझेही डोके फुटले होते. बाबासाहेबच्यामुळे समाजकार्यात नंतर ही सहभाग दिला. 8

वरील कांही मोजक्या मुलाखतीतून या संघर्षातील सत्याग्रहींच्या भावना व्यक्त होतात. वय वर्षे 13 या कोवळ्या वयापासून 75 वर्ष पर्यंत च्या सर्व महिलांचा सहभाग या सत्याग्रहात दिसून येतो. त्यांचा आत्मविश्वास, बाळासाहेब आंबेडकरांवरील निष्ठा ही कमालीची दुर्दम्य अशी दिसून येते. त्यांनी सोसलेल्या यातना यावेळी आपणास कदाचित वाचताना जाणवत नसतील पण महिलांच्या धर्म आणि समाज बंधनातुन मुक्तीसाठी खरोखर मुक्ती प्रेरणा आहेत. आजच्या शनि शिंगणापूर चौथ-याच्या प्रवेश संघर्ष हा काळाराम मंदिर प्रवेशाचा निश्चितच पुढचा टप्पा आहे. परंतु बाबासाहेब आंबेडकरांनी काळाराम मंदिर सत्याग्रहातून सर्व महिलांना ही प्रेरणा दिली. काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या शेवटी शेवटीच बाबासाहेबांनी दूर दृष्टीने येवले येथेच धर्मांतराची घोषणा का दिली हे सर्व महिलांनी जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये स्त्रियांनी महत्वाची भूमिका वठविली होती. त्याच प्रमाणे दलित मुक्ती चळवळी मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महिलानीही ऐतिहासिक कार्य केले. वरील स्त्रियांनी दलित तसेच महिला मुक्ती चळवळी मध्ये सहभाग नोंदविला. भारतीय स्वातंत्र्य आंदोलना मध्ये स्त्रियांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ -**

1. य.दि. फडके - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणी काळाराम मंदिर सत्याग्रह, सुगावा प्रकाशन, पु. 2008, पृ.10
2. उपरोक्त पृ. 09
3. कोहिनूर वृत्तपत्र, 10 एप्रिल 1930 – खैरमोडे चां.भ. : डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड 3
4. टाईम्स ऑफ इंडिया, 22 एप्रिल 1932
5. भार्गवे भावना - पद्मश्री दादासाहेब गायकवाड, 1968, नाशिक, शांताबाईण्दानी
6. य.दि. फडके - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणी काळाराम मंदिर सत्याग्रह, सुगावा प्रकाशन, पु. 2008, पृ. 143 - 144.
7. उपरोक्त पृ. 145-146
8. उपरोक्त पृ. 160-161.